**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि. ०१ मे २०२३**

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २९३/2023 भादंविसक २७९,३३७,४२७ मो.वाहन क्र १८४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २०/०४/२०२३ रोजी ०९.०० वा चे सुमारास रेल्वे स्टेशन जवळील सागर हॉटेल समोर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ३०/०४/२०२३ रोजी १४.३१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रोहित शशिकांत माने,वय-२३ वर्षे,रा-पांडुरंग वस्ती शास्त्री नगर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | चारचाकी वाहन क्र एमएच १३ डीक्यू ३५१० चा चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची स्कुटीपेप मोटार सायकल नं एमएच १३ डीझेड ८६२६ वरून रेल्वे स्टेशनमार्गे दमाणी नगरकडे जात असताना रेल्वे स्टेशन जवळील सागर हॉटेल समोर फिर्यादीचे मोटार सायकलीस चारचाकी वाहन क्र एमएच १३ डीक्यू ३५१० चा चालक त्याचे ताब्यातील चारचाकी वाहन बेदारकारपणे व हयगयीने चालवून फिर्यादीचे मोटार सायकलीस पाठीमागून जोरात धडक देवून फिर्यादीच्या दुखापतीस ,मोटार सायकल,मोबाईलचे नुकसानीस कारणीभूत झाला आहे.म्हणून. तपासः- मपोह/२७०/लांबतुरे- ९५५२५६१२७० |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २६०/2023 भादंविसक ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २७/०३/२०२१ ते दि २६/०२/२०२३ रोजी सासरी बसवेश्वर नगर नई जिंदगी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ३०/०४/२०२३ रोजी १८.३६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ मनिषा शिवानंद माने,वय-२३ वर्षे,रा-लाड वस्ती बाळे स्टेशन देगाव सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) शिवानंद खाजप्पा माने (पती),रा-सोलापूर २) ज्योती अमोल साळुंखे (नणंद), ३) अमोल साळुंखे (नदंवा),रा- पुणे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे पती यातील आरोपीत क्र १ हा फिर्यादीस घर खर्चाकरीता तसेच खाण्यापिण्याच्या वस्तु खरेदी करण्याकरीता माझ्याकडे पैसे नसून तू ते पैसे माहेरहून आण असे म्हणून शिवीगाळ व भांडण करीत असे,त्यास फिर्यादी कंटाळून दि २६/२/२०२३ रोजी फिर्यादीचे माहेरील लोकांना बोलावून आरोपी क्र १ यांची समजूत काढत असताना यातील आरोपी क्र १ हा फिर्यादीस तु तुझ्या माहेरच्याना का बोलावलीस असे म्हणून शिवीगाळ व मारहाण करू लागला तेव्हा फिर्यादीचे आई व वडिल भांडण सोडविण्याकरीता गेले असता यातील आरोपीत क्र १ यांने त्यांनादेखील मारहाण व शिवीगाळ केली.<br>परत नांदण्यास गेले तर फिर्यादीचा पती तिला निट नांदविणार नाही याची फिर्यादीस खात्री असल्याने फिर्यादीस आजपर्यत माहेरीच राहिली म्हणून वरील आरोपीत क्र २ व ३ यांनी मिळून फिर्यादीस पतीच्या व्यवसायाकरीता माहेरहून पैसे घेऊन ये ,तसेच फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेऊन वेळोवेळी मारहाण शिवीगाळी व दमदाटी करून फिर्यादीस शारीरीक व मानसिक त्रास होईल असे वागून जाचहाट व छळ केला आहे.म्हणून. तपासः- पोह/४९/कटके- ८६९१०६१६०६ |

# फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | २७०/२०२३ भादंविसक महा प्राण संरक्षण अधि १९७६ चे सुधारित कलम ५१(१),५ (ब),प्राणी क्लेश प्रति का १९६० चे कलम ११(१), सह मोवाकाक १९८९ चे कलम ८३/१७७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि ३०/०४/२०२३ रोजी रात्रौ ०२.५० वा. पुणे सोलापूर हायवे रोड वर मडकी वस्ती नागोबा मंदिर जवळ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ३०/०४/२०२३ रोजी ०८.१४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | पोकॉ/१७५८ रामदास बाळासाहेब घोडके,नेम- फौजदार चावडी पो.स्टे सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) अबरार वाहीद रंगरेज,वय-४५ वर्षे,रा- शनिवार पेठ,सोलापूर,२) समीर कुरेशी पुर्ण नाव माहित नाही रा-भारतीय चौक सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील आरोपीत हे वरील ठिकाणावरून महिंद्रा कंपनीची पिकअप क्र एमएच ४५ टी ३३९८ या वाहनामध्ये चालक नामे आरोपी क्र १ यांने सदर वाहनामध्ये ६ जनावरे हे दाटीवाटीने एकमेकांना बांधून त्यांचे चाऱ्यापाण्याची कोणत्याही प्रकारची सोय न करता त्यांना क्रुरतेने वागणूक देऊन तसेच चालकांकडे कोणत्याही प्रकारचा जनावरे वाहतुकीचा परवाना व खरेदी पावती नसल्याने व सदरची वाहने ही कत्तल करण्याच्या उद्देशाने वाहतूक करीत असताना मिळून आलेली आहेत म्हणून. तपास:- पोना/१३८५/कसबे- ८८३०३८३२३६ |